# "e- Jalseva Bulletin"

e-news letter

Editor
**T. N. Munde**

Executive Editor
**Mr. Pravin Kolhe**

Editorial Board
Mrs. Purnima Desai Mr. Avinash Patil
Mrs. Dhanashree Limaye Mr. Prashant Kadam
Mr. Nandkishor ranaware

Government of Maharashtra
**Water Recourses Department**

**September 2014**

Volume : IV Issue : V

## संपादकिय



ई-जलसेवा प्रकल्पांमध्ये आता दृकश्राव्य माध्यमाची मोलाची भर पडली असून महाराष्ट्रात एकुण दहा ठिकाणी Video Conference सेवा चालू करण्यात आली आहे. मा प्रधान सचिव, जलसंपदा यांनी ई-जलसेवा प्रकल्पाचा विभागवार आढावा V.C. द्वारे या महिन्यात घेतला. या माध्यमाचा प्रभावि वापर आपण निश्चितच अधिकाधिक करुन प्रामुख्याने वेळेची बचत करणार आहोत.

महाराष्ट्र शासन नियोजन विभागाने शासनाच्या सर्व विभागाशी संबंधित एकसुत्री, अचुक व अदयावत माहिती एकत्रितरीत्या उपलब्ध व्हावी म्हणून राज्य माहिती संचयिका निर्माण करण्यात आली आहे. शासनाच्या सर्व धोरणात्म, प्रशासकीय निर्णयाकरिता, जनहित याचिकाप्रश्नीस, माहिती अधिकार, आढावा बैठका, सर्व न्यायालयीन कामकाजाकरिता अधिकृत स्त्रोत म्हणुन ही माहिती वापरली जाईल. माहितीच्या अदयावतीकरणाची वारंवारीता (Frequency) निश्चित करणेची आहे. कृपया आपण विभागाची आवश्यक माहिती त्या त्या वेळी बिनचूक दयावयाची आहे. ई- जलसेवा प्रकल्पाचे राज्य माहिती संचयिकेशी समन्वय करण्यात येणार असलेने त्याकडे आपण अधिक लक्ष देणे आवश्यक आहे. ही माहिती संशोधक. विद्दयार्थी व सामान्य जनतेसाठी उपयुक्त होणार आहे.

जलसंपदा प्रकल्पातील सिंचन प्रकल्प व त्याअनुषंगिक यांचे नियोजन व कार्यान्वयन करण्यास्तव GIS प्रणालीचा निश्चित चांगला उपयोग होणार आहे. महाराष्ट्रातील सर्व जलस्त्रोतांचे Maping व प्रकल्प घटकांचे Maping, धरणांचे पोहच रस्ते, पुररेषा, बिगरसिंचन स्त्रोत या व इतर अनेक बाबीकरिता या प्रणालीचा वापर होईल. राष्ट्रीय सुदूर संवेदन केंद्र (NRSC-ISRO) यांचेमार्फत महाराष्ट्रासाठी स्वतंत्र WEB PAGE निर्माण करण्यात आले आहे. याबाबत Vision 2020 अहवालाध्ये ROADMAP तयार करण्याची प्रक्रिया सुरु आहे. नुकतीच नागपुर येथे यासंदर्भात दोन दिवसीय कार्यशाळा पार पडली. मा. प्रधान सचिव यांनी मंत्रालयीन बैठकीतही जलसंपदा विभागाच्या गरजा पाहून सदर प्रणाली त्वरेने विकसित करण्याबाबत आदेशित केले आहे. MRSAC यांचेकडे उपलब्ध नकाशे व माहिती जलसंपदा विभागाच्या विविध कामासाठी जसे भूसंपादन, पुर्नवसन, पिक मोजणी, पूरबाधित क्षेत्राचे नकाशे, Sedimentation survey of reservoir, धरणांचे आराखडे, Contour Maps यांकरिता करणे शक्य होईल.

संपुर्ण महाराष्ट्रात घ्यावयाच्या ई-जलसेवा अभियानाबाबत आपल्याला काही नाविन्यपूर्ण कल्पना असतील तर जरुर कळवाव्यात, त्यांचे स्वागत केले जाईल. अभियान सर्वांनी एकत्र येऊन यशस्वी करु या. आपणा सर्वांना गणेशोस्तवाच्या हार्दिक शुभेच्छा!.

## ई-सेवा पुस्तक : ई-प्रशासन कार्यक्रमांतर्गत नवीन उपक्रम



प्रविण कोल्हे
कार्यकारी अभियंता

शासकीय कामकाज माहिती व तंत्रज्ञानामधील प्रगतीच्या सहाय्याने जलद व कार्यक्षमपणे पार पाडावे यासाठी सर्वच शासकीय विभागांनी ई-प्रशासन प्रकल्पांना प्राधान्य दिलेले आहे. आपल्या विभागाने देखील ई-जलसेवा हा महत्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतला असुन, त्यामार्फत जल व सिंचन विषयक सर्व माहिती एकत्रितरित्या उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

शासकीय अधिकारी आणि कर्मचारी यांच्या सेवा विषयक बाबींसाठी सेवा पुस्तक प्रत्येक कार्यालयात जतन करण्यात येते व त्यामध्ये महत्वाच्या नोंदी वेळोवेळी घेण्यात येतात. सेवापुस्तक हे महत्वाचे दस्त असुन शासकीय कर्मचाऱ्याच्या बाबतीत त्यामध्ये वेळोवेळी नोंदी अद्ययावत करणे, त्याचे जतन करणे, व आवश्यकता भासल्यास ते उपलब्ध होणे महत्वाचे आहे. तथापि, कागदी स्वरुपात सदर सेवा पुस्तक जतन करण्यामध्ये खुप अडचणी असल्यामुळे व या सेवा पुस्तकातील नोंदी संबंधित अधिकारी / कर्मचारी यांना दाखवुन त्याची पडताळणी करणे हे जिकरीचे काम ठरते. त्यामुळे सेवा विषयक बाबींमधील तृटी असल्यास, त्या वेळेतच दुरुस्त झाल्यास, भविष्यात होणारा त्रास टळू शकतो, याच अनुषंगाने राज्य शासकीय अधिकारी / कर्मचारी यांना ही सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी ई-सेवा पुस्तक (e-Service Book) ही संगणकीकृत प्रणाली राबविण्याबाबत मा. उप लोक आयुक्त यांनी शिफारस केली आहे.

याला अनुसरुन सामान्य प्रशासन विभाग आणि माहिती तंत्रज्ञान विभाग यांच्या मार्फत महाऑनलाईन (TCS) या कंपनीद्वारे सदर प्रणाली विकसित करण्यात आलेली आहे. जलसंपदा विभागामध्ये सदरची प्रणाली राबविण्याबाबत कार्यवाही सुरु करण्यात आली आहे. सदर प्रणाली ही विभागाच्या गरजांनुसार सुधारीत करुन, त्यात आवश्यक ते फेरबदल करण्यासाठी कोयना संकल्पचित्र मंडळ, पुणे येथे पथदर्शी कार्यक्रम राबविण्यात आला. सद्यस्थितीत या मंडळातील १६५ अधिकारी / कर्मचारी यांची माहिती या प्रणालीमध्ये भरण्यात आलेली आहे. यामुळे अनेक प्रकारचे अहवाल हे मंत्रालयापासुन ते विविध स्तरावरील अधिकारी यांना उपलब्ध होत आहेत.

अशा प्रकारे विभागातील सर्व अधिकारी / कर्मचारी यांची माहिती क्षणार्धात संबंधितांना उपलब्ध झाल्यास निर्णयप्रक्रियेला वेग येऊन सेवाविषयक बाबींचा निपटारा होण्यास मदत होणार आहे. म्हणुनच सर्वांना विनंती करण्यात येते की सदर प्रणाली उपलब्ध करुन दिल्यानंतर त्यामध्ये माहिती भरण्याच्या कालबध्द कार्यक्रमानुसार कार्यवाही करण्यात यावी.

## जलसंपदा विभागाचे एकात्मिक संकेतस्थळ कशासाठी?



नंदकिशोर रणवरे
सहा. अभि.श्रेणी-१

शासन पत्र क्र. संकीर्ण-२०१४/प्र.क्र.०७/संकाक,दि. ११ ऑगस्ट २०१४ अन्वये शासनाने जलसंपदा विभागाचे अद्ययावत केलेले www.wrd.maharashtra.gov.in हे संकेतस्थळ विभागाचे एकात्मिक संकेतस्थळ म्हणुन घोषित केले आहे. तसेच विभागातील इतर सर्व संकेस्थळे (www.mahahp.org, www.rtsfros.com/mahakrishna व www.walmi.org वगळता) बंद करण्याबाबत शासनाने स्पष्ट सुचना दिल्या आहेत. अभि. श्रेणी-१

शासनाचा हा निर्णय सर्व बाजुंचा विचार करता अतिशय योग्य आहे असे म्हणता येईल. कोणत्याही शासकिय विभागाच्या संकेस्थळची निर्मिती ही देशाच्या सर्वसामान्य नागरीकांना त्या विभागाशी निगडीत ज्यास्तीत ज्यास्त सेवा व माहिती सहज व सोप्या पद्धतीने उपलब्ध करुन देता येण्यासाठी करण्यात येते. तसेच सदर विभागाच्या कर्मचारी व अधिकारी वर्ग यांना दैनंदिन कामकाज व त्या संबंधित माहिती प्राप्त करण्यासाठीही संकेतस्थळाचा उपयोग होतो. संकेस्थळांद्वारे अधिक कार्यक्षम, पारदर्शी व व्यापक स्वरुपातील सेवा शासन जनतेसाठी उपलब्ध करुन देऊ शकते.

या अनुषंगाने जलसंपदा विभागाने ई-जलसेवा हा महत्वाकांशी प्रकल्प हाती घेतला आहे. या प्रकल्पाद्वारे जलसंपदा विभागाचे नवीन अद्ययावत असे www.wrd.maharashtra.gov.in हे संकेतस्थळ बनिविण्यात आलेले आहे. तसेच या प्रकल्पाअंतर्गत ई-जलसेवा प्रणालीद्वारे विभागाची सर्व कार्यप्रकारांची माहिती एकत्रित करुन, आवश्यक ती सर्व माहिती नागरीकांसाठी “नागरिक सेवा” या टॅब अंतर्गत उपलब्ध करुन देण्यात आली आहे. तसेच जलसंपदा विभागाचे सर्व अधिकारी व कर्मचारी यांना आपले दैनंदिन कामकाज करिता आवश्यक ती सर्व माहिती उदा. शासन निर्णय, परिपत्रके, कायदे व नियम, प्रकाशने इत्यादी सर्व बाबी संकेस्थळावरती उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. एकंदर हे संकेस्थळ जलसंपदा विभागाच्या माहितीचे केंद्र बिंदु झालेले असुन त्यावरती विभागासंबंधित इत्यंभूत अदयावत अशी सर्व माहिती उपलब्ध आहे. सदर संकेस्थळाचे Cecurity Audite ही नियंमाप्रमाणे वेळोवेळी करुन घेण्यात येते, तसेच ही सर्व माहिती राज्याच्या State Dat Center मध्ये अतिशय सुरक्षितरीत्या साठवुण ठेवण्यात येते.

जलसंपदा विभागाच्या www.wrd.maharashtra.gov.in या मुख्य संकेस्थळा व्यतिरीक्त विभागातील इतर कार्यालयांची वैयक्तिक अशी अंदाजे ३० ते ४० संकेतस्थळे कार्यरत आहेत. या सर्वांचा अभ्यास केला असता असे दिसुन येते की बहुतांश संकेस्थळांवरील माहिती ही स्थायी स्वरुपाची असुन ती अदयावत ठेवण्यात येत नाही. तसेच त्यांची डोमेन नेम माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००१ व माहिती तंत्रज्ञान (दुरुस्ती) अधिनियम २००८ अन्वये gov.in असे असणे आवश्यक असताना ते .org, nic.in अशा प्रकारचे आढळुन येतात. यातील अनेक संकेतस्थळांचे Server हे देशाबाहेर स्थित आहेत, असे असणे हे माहिती तंत्रज्ञान कायदा २००८ अन्वये गुन्हा ठरु शकते. या संकेतस्थळांचे कुठल्याही प्रकारचे Security Audit होत नसल्याने त्यातील अनेक संकेतस्थळे Virus Affected झालेली आढळुन येतात. शासनाच्या GIGW मार्गदर्शक तत्वांप्रमाणे शासनाची सर्व संकेस्थळे मराठी (युनिकोड) व इंग्रजी भाषेत असणे आवश्यक असताना यातील अनेक संकेस्थळे या अटी पाळण्यास असमर्थ ठरतात. इत्यादी सर्व कारणांमुळे सदर संकेस्थळे बंद करुन शासनाने जलसंपदा विभागाचे एकात्मिक संकेस्थळ www.wrd.maharashtra.gov.in अंतर्गत उलब्ध असलेल्या संघटन तक्त्या द्वारे सर्व महात्वाच्या कार्यालयांची (महामंडळे) व संस्थांची (मेरी, मेटा, डीआयआरडी इत्यादी) माहिती उपब्ध करून देण्याचे नियोजन केले आहे. उर्वरीत सर्व कार्यालयांची माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ अन्वये प्रसिध्द करावयाची १७ बाबींची माहितीच सदर संघटन तक्त्यावरील टॅबच्या अंतर्गत उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. यामुळे सर्वसामान्य नागरिकांना एकाच संकेस्थळावरुन जलसंपदा विभागाची सर्व एकत्रितरीत्या उपलब्ध होणार आहे, तसेच सर्व माहिती ही अदयावत, सुसुत्रित, व सुरक्षित राहणार आहे.



मोडयुल M24 चार दिवसीय कार्यशाळा, मेटा नाशिक ( दिनांक- २५ व २८ ऑगस्ट

## ई–जलसेवा वृत्तांत

1. Video conferencing facility started at 10 locations across the state

2. Review of e-Jalseva system data entry and validation taken by Hon PS (CAD) on 25/8/2014 through

Video Conferencing

3. Two day workshop on GIS conducted at MRSAC, Nagpur for Water Resources Department

4. Master Data of select projects of WRD will be shared with State Data Bank on their portal and the same will be available to all the citizens

5. e-Jalseva version 1.2 will be launched soon